**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)**
**गणेशखिंड, पुणे**

**Media Co-ordination Cell**
Ganeshkhind, Pune-7

---

दि. १४ जुलै २०१८

# अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांचा निकाल २०१५ च्या पॅटर्ननुसार लावण्याचा निर्णय

पुणे - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभियांत्रिकी (इंजिनिअरिंग) शाखेच्या सर्व वर्षांच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन व निकाल आता २०१५ पॅटर्ननुसार करण्याचा निर्णय विद्यापीठातर्फे शनिवारी (१४ जुलै २०१८) घेण्यात आला. त्यामुळे पुढील वर्षात प्रवेश घेण्यापासून अपात्र ठरलेल्या अनेक विद्यार्थ्यांना या निर्णयाचा लाभ होणार आहे.

विद्यापीठाच्या २००८ आणि २०१२ या पॅटर्नच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन व निकाल हे टक्केवारी पद्धतीने लावले जात, तर २०१५च्या पॅटर्ननुसार विद्यार्थ्यांचे मूल्यमापन व निकाल हे क्रेडिट पद्धतीनुसार घोषित केले जातात. विद्यापीठाच्या २००८ आणि २०१२ या पॅटर्नच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन व निकाल २०१५ च्या पॅटर्ननुसार करण्याची मागणी काही विद्यार्थ्यांनी केली होती.

याबाबत विद्यापीठाच्या अधिकार मंडळाची बैठक झाली. या तीनही पॅटर्नच्या विद्यार्थ्यांनी एकच शिक्षण घेतले तसेच, त्यांनी सारखीच परीक्षा दिली. त्यामुळे त्यांचे मूल्यमापन व निकालही एकाच पद्धतीने लावला जावा, हा विचार या बैठकीत करण्यात आला. या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, २००८ व २०१२ पॅटर्नच्या विद्यार्थ्यांचे निकाल २०१५ पॅटर्ननुसार तयार केले जाणार आहे. त्यांची गुणपत्रके मात्र टक्केवारीनुसार देण्यात येतील, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

---

**अभिजित घोरपडे**
विशेष कार्याधिकारी, माध्यम समन्वय कक्ष
sppumediacell@gmail.com